असा. क्र. १२३ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**शनिवार, जून ७, २००८/ज्येष्ठ १७, शके १९३०**

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार-ब

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**महसूल व वन विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ७ जून २००८

**आदेश**

**मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८.**

क्रमांक मुद्रांक. २००७/९२२/प्र.क्र.१९९/म-१.— मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ (१९५८ चा मुंबई साठ) याच्या कलम ९, खंड (अ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्या बाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या अधिकारांचा वापर करून, लोकहितास्तव तसे करणे आवश्यक असल्याबाबत खात्री पटल्यामुळे महाराष्ट्र शासन याद्वारे, दिनांक ९ जून २००८ पासून दिनांक ८ सप्टेंबर २००८ पर्यंतच्या कालावधीत घर, बंगला, सदनिका, रो-हाऊस, दुकान किंवा कार्यालय इत्यादी म्हणून व्यवहारात अधिक ओळखली जाणारी निवासी किंवा अनिवासी युनिटे

यांच्या संबंधातील संलेख किंवा सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या मंजूर आराखड्यातील जमिनीचे हस्तांतरण यांच्या संबंधातील संलेख यांवरील मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ याची कलमे ३१(४) (दोन), ३२अ(२), ३२अ(४) व ३९(१) (ब) अन्वये आकारणीयोग्य असलेली शास्तीची रक्कम ही,—

(क) अपुऱ्या मुद्रांक शुल्कातील फरकाची रक्कम पंचवीस हजार रुपयांपर्यंत असल्यास, ती पाचशे रुपयांपर्यंत कमी करीत आहे ; आणि

(ख) अपुऱ्या मुद्रांक शुल्कातील फरकाची रक्कम पंचवीस हजार किंवा त्यापेक्षा अधिक रकमेपर्यंत असल्यास ती, एक हजार रुपयांपर्यंत कमी करीत आहे.

१. ही योजना "अभय योजना, २००८" या नावाने ओळखण्यात येईल.

२. पुढील अटी व शर्तींच्या अधीनतेनें कमी केलेल्या शास्तीचा लाभ घेता येईल :—

(एक) अर्जदार, मूळ संलेख व त्याची साक्षांकित प्रत यांसह याला जोडलेल्या नमुन्यात अर्ज करील.

(दोन) संलेखाच्या बाबतीतील पक्षकार किंवा त्याच्या हक्काचा उत्तराधिकारी किंवा मुखत्यारनामाधारक हा, अर्ज करण्यास हक्कदार असेल.

(तीन) मुद्रांक शुल्क हे, अर्ज सादर करण्याच्या दिनांकाच्या दिवशीच मालमत्तेच्या बाजारमूल्याच्या आणि संलेख निष्पादित करण्याच्या दिनांकास लागू असलेल्या मुद्रांक शुल्काच्या दराच्या आधारे निर्धारित केले जाईल.

(चार) अर्जदारास, मुद्रांक शुल्क निर्धारणाच्या दिनांकाच्या दिवशीच त्याने प्रत्यक्ष भरावयाचे मुद्रांक शुल्क आणि त्यावरील शास्ती याविषयीची माहिती देण्यात येईल. तद्‌नंतर, अर्जदारास, ती रक्कम लगतनंतरच्या कामाच्या दिवशीच भरावी लागेल.

(पाच) म्हाडाद्वारे निष्पादित करण्यात आलेले संलेख वगळता, साध्या कागदावर निष्पादित केलेले व मुद्रांकित नसलेले संलेख या योजनेअंतर्गत कोणताही लाभ मिळण्यास हक्कदार असणार नाहीत.

(सहा) या योजनेअंतर्गत पात्र असलेले, मात्र कलमे ३२अ, ३३ किंवा ३३अ खाली ज्यावर यापूर्वीच कारवाईस सुरूवात झाली असेल किंवा कलम ४६ अन्वये जमीन महसूलाची थकबाकी म्हणून देय रकमांची वसुली करण्यासाठी ज्यावर कारवाईस सुरुवात करण्यांत आली असेल किंवा मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ च्या तरतुदींखाली कोणत्याही न्यायालयासमोर किंवा प्राधिकाऱ्यांसमोर ज्यावर अपील किंवा अर्जाचे पुनर्विलोकन यांवरील निर्णय प्रलंबित असेल असे दस्तऐवज या योजनेचा लाभ मिळण्यास हक्कदार असतील. तथापि, याचा लाभ मिळविण्यासाठी अर्जदार, विभागाद्वारे आकारण्यात आलेले विवादास्पद मुद्रांक शुल्क भरील. वर विहित केलेल्या वेळेच्या आत, आवश्यक ते शुल्क व शास्ती भरल्यावर, संबंधित व्यक्ती, मुद्रांक शुल्क व शास्ती यांची रक्कम भरल्याविषयी संबंधित प्राधिकाऱ्यास कळवील.

(सात) या योजनेअंतर्गत पात्र असलेला दस्तऐवज, जर यापूर्वीच, शासकीय अधिसूचनांद्वारा अधिसूचित केलेल्या, (१)एसटीपी-१०९४/सी.आर.३६१(डी)/म-१, दिनांक ११ मे १९९४, (२) मुद्रांक-१०९७/३१६०/सी.आर.५६१/म-१, दिनांक ५ जुलै १९९७ (३) मुद्रांक-१०९८/१००४/सी.आर.१९०/म-१, दिनांक २६ नोव्हेंबर १९९८.

(४) मुद्रांक-२००३/सी.आर.१८५/म-१, दिनांक २४ जानेवारी २००४ व १७ मे २००४ ुगोदरच्या योजनांतर्गत सादर करण्यात आला असेल तर, आणि संबंधित योजनेअंतर्गत मुद्रांक शुल्क व शास्ती यांची रक्कम देखील अद्यापि भरण्यात आली नसेल तर मात्र त्यांनी या नव्या अधिसूचित योजनेखाली अर्ज केला तर, या नवीन योजनेअंतर्गत लाभ मिळण्यास ते पात्र असतील.

३. मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकरण, महाराष्ट्र शासन, पुणे हे, या योजनेच्या अंमलबजावणीसाठी तृत प्रशासकीय निदेश काढतील.

## अभय योजना, २००८

## जोडपत्र

## अर्जाचा नमुना

अर्जदाराचे संपूर्ण नाव :

पत्ता :

अर्जाचा दिनांक :

प्रति,

मुद्रांक जिल्हाधिकारी

.........................

**विषय.**—अभय योजना, २००८ अंतर्गत मुद्रांक शुल्क भरणेबाबत.

**संदर्भ.**—शासन आदेश महसूल व वन विभाग क्र. मुद्रांक. २००७/९
प्र.क्र.१९९/म-१, दिनांक ७ जून २००८.

महोदय,

मी उपरोक्त आदेश वाचले असून, विषयांकित योजनेअंतर्गत मला कमी असलेले मुद्र शुल्क भरणेची इच्छा आहे. योजनेच्या अटी व शर्ती मला मान्य आहेत. या योजनेत ग घेण्यासाठी सोबत दस्तऐवज व पूरक कागदपत्रे जोडले आहेत. त्याचा तपशील पुढीलप्रम आहे :—

१. दस्तऐवजाचा प्रकार :--

२. निष्पादन दिनांक :--

३. दस्त नोंदणी केलेला असल्यास दस्त क्रमांक व दुय्यम निबंधक कार्यालय. :--

४. ठरलेला मोबदला :--

५. मिळकतीचा तपशील :--

(१) गांव/पेठ/वॉर्ड

(२) सं.नं./सि.स.नं.

(३) विषयवस्तू असलेल्या मिळकतीचा तपशील :

| विषय | जमीन | फ्लॅट | ऑफीस | दुकान | टेरेस | पार्किंग | भोवती मोकळी जागा | रो-हाऊस |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| क्षेत्र | | | | | | | | |
| जमीन | | | | | | | | |
| बांधकाम | | | | | | | | |

(**टीप :**—रकाना क्र.३ ते ७ बाबत बहुमजली इमारत असल्यास, मजले व लिफ्ट आहे काय याचा तपशील होय/नाही)

६. मिळकतीचे खरे बाजारभाव मूल्यावर परिणाम करणाऱ्या इतर बाबी उदा. इमारतीचे वय, बांधकाम प्रकार इत्यादी. :--

७. इतर तपशील, पूर्वी मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ मधील तरतुदीनुसार अथवा अभय योजना, २००४ नुसार झालेली कार्यवाही व प्रकरणाची सद्य:स्थिती :--

८. दर्शनी किंमतीप्रमाणे देय मुद्रांक शुल्क :--

९. दस्तास दिलेले मुद्रांक शुल्क :--

१०. प्राधिकृत करण्यात आलेल्या व्यक्तीचा तपशील (कागदपत्रासह) :--

मी असे जाहीर करतो की, माझे सोबत जोडलेल्या दस्तऐवजाबाबत मुबई मुद्रांक अधिनियम, १९५८ अन्वये कमी पडलेल्या मुद्रांक शुल्काच्या वसुलीसाठी वर परिच्छेद ५ मध्ये दर्शविलेल्या कार्यवाहीखेरीज इतर कोणतीही कार्यवाही अपील प्राधिकारी अथवा कोणतेही न्यायालय अथवा महसूल प्राधिकारी यांचेसमोर प्रलंबित नाही.

मी असेही जाहीर करतो की, माझे माहितीप्रमाणे वरील माहिती पूर्णत:खरी आहे. मी योजनेच्या अटी व शर्ती वाचल्या असून त्या मला मान्य आहेत. मुद्रांक शुल्क भरणेची जबाबदारी माझेवरच आहे.

आपला विश्वासू,

(अर्जदाराची सही व दिनांक)

**सोबत कागदपत्रे :**

(१) नाव, पत्ता व पोस्टाची तिकिटे लावलेले दोन लखोटे

(२)

(३)

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**वा. ना. आभाळे,**
कार्यासन अधिकारी.

**सोबत कागदपत्रे :**

(१) नाव, पत्ता व पोस्टाची तिकिटे लावलेले दोन लखोटे

(२)

(३)

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**वा. ना. आभाळे,**
कार्यासन अधिकारी.